जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११ दिनांक - ०४/०१/२०२४**

चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## अनुज जितेंद्र यादव (टोळी प्रमुख) व त्यांचे ०६ साथीदार यांचेवर मकोका अंतर्गत कारवाई

दि.२४/१२/२०२३ रोजी आनंद पार्ककडुन वडगांव-शेरीकडे जाणारे रोडवरील पवन सुपर मार्केटचे शेजारी दिगंबरनगर वडगांव-शेरी,पुणे याठिकाणी फिर्यादी हे त्यांचा मित्र ऋषीकेश ढोरे याचे यातील नमुद इसम आकाश पवार याचे सोबत झालेली भांडणे मिटविण्यासाठी गेले असता,आकाश पवार याने ऋषीकेश यास मारहाण करून,अनुज यादव याने त्याचेकडे असलेल्या धारधार हत्याराने ऋषीकेश यास जीव ठार मारण्याचे उद्देशाने डोक्यावर वार करुन गंभीर जखमी केले. तसेच अनुज याचे साथीदार आकाश पवार, हरिकेश चव्हाण, अमोल चोरघडे, अक्षत ताकपेरे, राहुल बारवसा व इतर मुलांनी मोठ-मोठ्याने शिवीगाळ करुन तेथे पडलेल्या दगड व विटांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी, अभि आगरकर व योगेश असे ऋषीकेशला वाचविण्यासाठी गेले असता,अनुज याने त्याचेकडे असलेल्या धारधार हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यावर तसेच अभि आगरकर व योगेश याचेवर वार करुन गंभीर जखमी करून सदर भागात दहशत निर्माण करीत निघुन गेले म्हणुन त्यांचे विरुध्द फिर्यादी यांनी दिले फिर्यादीवरुन **चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५९१/२०२३,भा.द.वि.कलम ३०७,३२६,३२४,१४३,१४४,१४७,१४८,१४९, आर्म ॲक्ट कलम ४(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),१३५,क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कलम ०३ व ०७** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान **१)अनुज जितेंद्र यादव,वय-१९ वर्षे,रा.गंगोत्री निवास,वडगाव-शेरी, पुणे (टोळी प्रमुख)२)हरिकेश टुणटुण चव्हाण,वय-१८वर्षे,रा.आनंदपार्क, वडगाव-शेरी,पुणे ३)आकाश भारत पवार,वय-२३ वर्षे,रा.,वडगाव-शेरी,पुणे ४)अमोल वसंत चोरघडे,वय-२३ वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे ५)संदेश सुधीर कांबळे,वय-२५ वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे ६)अक्षत निश्चल ताकपेरे,वय-२० वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे (टोळी सदस्य)** ७)राहुल विनोद बारवसा,वय-२३ वर्षे,रा.वडगाव-शेरी,पुणे हा (पाहीजे आरोपी) **असुन,यातील नमुद आ.क्र.१ ते ६ यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.**

आरोपी अनुज जितेंद्र यादव (टोळी प्रमुख) व त्याचे इतर साथीदार यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी तयार केली असुन,अवैध मार्गाने आपली बेकायदेशीर कृत्य चालु ठेऊन संघटना किंवा टोळी म्हणुन संयुक्तपणे संघटीत गुन्हेगारी कृत्य करणारा गट तयार केला असुन सदर टोळीने मागील १० वर्षात **खुनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी करणे,जबरी चोरी करताना इच्छापुर्वक दुखापत करणे, मालमत्तेचे नुकसान करणे,बेकायदेशीर जमाव जमविणे,बेकायदेशीररित्या हत्यारे बाळगुन दहशत निर्माण करणे इत्यादी प्रकारचे गुन्हे** केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांचेवर यापुर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटित दहशतीचे मार्गाने स्वतःचे आर्थीक फायद्याकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करणेकामी चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.राजेंद्र लांडगे यांनी पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,पुणे शहर, श्री. शशिकांत बोराटे यांच्या मार्फतीने अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५९१/२०२३ भा.द.वि कलम ३०७, ३२६,३२४,१४३,१४४,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३), १३५,क्रिमीनल लॉ ॲमेंटमेंट कलम ०३ व ०७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे ३(१)(ii),३(२),३(४) या कलमाचा अंतर्भाव करण्याची मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा, पुणे (मा.पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार) श्री.रामनाथ पोकळे,मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजन कुमार,मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे,मा.सहा. पोलीस आयुक्त,खडकी विभाग,पुणे,श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे)श्रीमती मनिषा पाटील, पोलीस उप निरीक्षक,दिलीप पालवे, पोलीस उप-निरीक्षक,अरविंद कुमरे, पोलीस उप-निरीक्षक,संजय गायकवाड, पोलीस अंमलदार,राजेश नवले, रामचंद्र गुरव, पंकज मुसळे, नाना पतुरे, गणेश आव्हाळे, अनुप सांगळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारीक लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ११० वी कारवाई आहे.**